CMYK

बीड । सोमवार

१९.०५.२०२५

वर्षे : ५ अंक : ४८

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955






# दादा, विमानतळ नको

## बीडकरांना प्यायला पाणी पाहिजे





## पिण्याच्या पाण्यासाठी ३३ कोटीची विशेष तरतूद करा !

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराच्या उशा पायथ्याला तळ आहे. अमृत अटल योजनेतून कोट्यवधी रुपये खर्चून योजना उभारली परंतु योजनेचा लाभ आणी समाधान नागरीकांना अद्याप मिळत नाही. नागरिकांनी किती दिवस प्रतीक्षा करायची ?

कश्मीर प्रश्न सुटण्याची शक्यता वर्तवता येईल, पण बीडकरांचा नियमीत पाणी पुरवठा प्रश्न कधी मार्गी लागणार ! गंभीर समस्या परंतु टोलवा टोलवी चालू आहे.

**● सुमारे ३३कोटी लाईट बील**

थकल्यामुळे वीज पुरवठ दिला जात नही. रक्कम मोठी असली तरी नागरीकांच्या मुलभूत गरजे साठी शासनाच्या वतीने अजित दादांनी पुढाकार घेतलाच पाहिजे. लोकानी घरपटी नाही भरली तर कुठून लाईट बील भरणार ? असा प्रश्न पालकमंत्री अजितदादांनी उपस्थित केला. दादा तुमचं खरय ! परंतु लोकापेक्षा नगर



परिषदेची सत्ता भोगणारे पुर्णपणे दोषी आहेत. चुकीच नेतृत्व मिळालं आणी बीड नगर परिषदेच्या कारभाराचा बट्ट्याबोळ झाला. नगर परिषदेचे भोगवटदार आणि ताबा मिळवण्यासाठी आसुसलेले तुमच्या अवतीभवती आहेत. लोकांना पिण्याचे पाणी, स्वच्छता, लाईट व्यवस्था सह मूलभूत सुविधा मिळाल्या असत्या तर लोकांनीही कर भरण्यासाठी उत्साह दाखवला असता. परंतु नगरपालिके तील नेतृत्वाने लोकांचे हित समोर ठेवून काम केले नाही. त्यामुळे कर वसुलीलाही प्राधान्य दिले नाही. शासनाला विशेष निधी देता येतो, फक्त तुमची राजकीय इच्छा शक्ती हवी. आपण राज्याचे उपमुख्यमंत्री, अनुभव सिद्ध अर्थमंत्री, व कर्तबगार पालकमंत्री म्हणून राज्याला परिचित आहात. ३ कोटीचा निधी तुमच्यासाठी थोडा असला तरी बीडकारांचे भाग्य उजाळणारा आहे. थकित लाईट बिल भरण्यासाठी बीड नगरपालिकेला विशेष निधी देऊन बिडकर यांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या कायमची सोडवा. खरच दादा आज बीडकरांना विमानतळाची गरज नाही ; आणि कोणी मागणीही केलेली नाही. तहानेने व्याकुळ झालेल्या नागरिकाला विमान प्रवास तरी कसा सहन होणार ?

### जनतेचा कोरडा घसा ओला करण्यासाठी एकदा हात झटकाच

**कार्यकर्ते पोसण्यासाठी निधीची खैरात एक वर्ष रोखा. बीड नगरपालिकेला चांगला सीईओ द्या. लाईट ,पाणी, स्वच्छता, नाली, रस्ते या मूलभूत सुविधांचा आढावा घेऊन प्रशासनाला सक्त ताकीद द्या. तरच बीड शहराच्या विकासाला गती मिळेल. बीडकरांना मूलभूत सुविधांचा लाभ घेता येईल.**

# निराधार लाडक्या आजींना पगार कधी मिळणार ?

**तहसील प्रशासनाचा भोंगळ कारभार; वृद्ध माय बापड्यांनी किती खेटे मारायचे ?**

**बीड । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत लाडक्या बहिणींना अनुदान देऊन राजकारणाची पोळी भाजली. मतदानावर लक्ष केंद्रित करणे घराघरातील महिलांना अनुदान पोहोचवण्या साठी शासनाने प्रयत्नांची पराकाष्टा केली. सत्ता स्थापन



केली. परंतु गोरगरीब, विधवा, म्हाताऱ्या मायबापड्यांना आधार असणारा संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान गेली कित्येक महिन्यापासून लाभार्थ्यांना मिळालेले नाही. ऑनलाइन, केईवायसीचे कारण पुढे करून रोज गोरगरीब जनतेला तहसील मध्ये खेट्या मारण्याची वाईट वेळ प्रशासनाने आणली. भर उन्हात गोरगरिबांचे हाल होत आहेत.

▶▶ उर्वरित पान २ वर

## उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांचा दौरा कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अजित पवार सोमवार, दि. १९ मे रोजी एक दिवसाच्या बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे.

सकाळी ८:०५ वाजता शक्तीकुंज वसाहत मैदान, थर्मल परळी वै. हेलीपॅड वर आगमन नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी ८:१५ वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर येथे आगमन. ८:१५ वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग दर्शन त्यानंतर मोटारीने प्रयाण.सकाळी ९:०० वाजता शासकीय विश्राम गृह, परळी, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी ९.०० वाजता वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत श्री. क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा व परळी औद्योगिक औष्णिक केंद्राचे सादरीकरण यावर चर्चा. नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी १०.३० वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी १०.३० वाजता सादरीकरण. नंतर बाह्य विभागाची नूतनीकृत इमारत तसेच मुलांच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# खा. बजरंग सोनवणेंची शिवराज दिवटे यांना रुग्णालयात भेट

**परळीतील गुंडगिरीवर कठोर कारवाईची मागणी**

**बीड । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील अमानुष मारहाणीच्या घटनेत जखमी झालेला लिंबोटा येथील तरूण शिवराज दिवटे हा अंबाजोगाईतील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय रूग्णालयात उपचार घेत आहे. दि.१८ रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी त्याची रूग्णालयात जावून भेट घेत सर्व घटनाक्रम जाणून घेतला. शिवाय, घाबरू नको, मी सोबत आहे, असाही धीरही दिवटेला दिला. दरम्यान, गेल्या कांही वर्षात तयार ▶▶ उर्वरित पान २ वर





*शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मुख्य प्रदोत, शिवसेना नेते मा. सुनिलजी प्रभु साहेब यांची भेट घेऊन जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी त्यांच्या जिल्हाप्रमुख पदाच्या दोन महिन्यांचा कार्य अहवाल सुपूर्द केला. यावेळी संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव साहेब, नवनाथ प्रभाळे, सतिशसिह परदेशीं, अभिजित विप्र*

# पाकिस्तान सारख्या भिकारी राष्ट्राने भारत देशाशी लढण्याचे स्वप्न बघू नये: आ.सुरेश धस

**भव्य शौर्य तिरंगा यात्रेने.. आष्टीकरांचे वेधले लक्ष..**

**आष्टी । प्रतिनिधी**

पाकिस्तान आतंकी स्थान झाला आहे.. पाकिस्तानचे सैन्यदल हतबल झाले आहे मोठ्या मोठ्या वल्गना करणारे.. अगर पाणी बंद कर देंगे तो खून की नदिया बहेंगी म्हणणारे पाकिस्तान मंत्रिमंडळ बंकर मध्ये लपून बसले.. संपूर्ण जगासमोर पाकिस्तानची नाचक्की झाली आहे.. पाकिस्तान सारख्या भिकारी राष्ट्राने भारताशी लढण्याचा विचार ही करू नये.. अब नरेंद्र मोदी का नया भारत है.. देश मोदी जी के साथ है, और देश सेना के साथ है असे प्रतिपादन आ.



सुरेश धस यांनी केले

आष्टी येथे त्यांनी आयोजित केलेल्या..शौर्य तिरंगा यात्रेच्या समारोपप्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते.. यावेळी व्यासपीठावर श्रीमती भाकरे श्रीमती काकडे श्रीमती कमल सोंडगे श्रीमती रत्नमाला वाल्हेकर श्रीमती अरुणा नागरगोजे श्रीमती भाग्यश्री राख श्रीमती सीताबाई राख श्रीमती सीताबाई गायकवाड श्रीमती तावरे या केवळ वीर पत्नी वीरमाता यांची उपस्थिती होती प्रमुख पदाधिकारी व देशप्रेमी नागरीक प्रचंड संख्येने आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# अजितदादा पवार यांच्या सभेला बहुसंख्येने उपस्थित रहावे: आ. विजयसिंह पंडित

- **विकास कामांसह अतिक्रमणधारकांना पीटीआर वाटपाचा शुभारंभ होणार**
- **महेश दाभाडे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी प्रवेश**
- **आम्ही गोर-गरीबांचे अतिक्रमण नियमाकुल केले, विरोधकांनी स्वता:ची अतिक्रमणे नियमाकुल करण्यासाठी सत्तेचा वापर केला - आ. विजयसिंह पंडित**

**गेवराई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीनंतर गेवराई शहरात १८ कोटी रुपयांचा निधी मंजुर झाला, अनेक वर्षापासुन प्रलंबित असलेला हक्काच्या पीटीआर चा प्रश्न कायमस्वरुपी निकाली निघाला. उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वामुळे हे शक्य झाले. त्यांच्या शुभहस्ते विकास कामांसह अतिक्रमण धारकांना पीटीआर वाटपाचा शुभारंभ सोमवार दि. १९ मे रोजी सायं. ५.३० वा. गेवराई शहरात होणार आहे. या निमित्ताने आयोजित केलेल्या सभेला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. गेवराई येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांच्यासह त्यांच्या सहकार्यांच्या पक्ष प्रवेशाची घोषणा केली.

गेवराई शहरातील १८ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांसह अतिक्रमणधारकांच्या हक्काच्या पीटीआर वाटपाचा शुभारंभ सोमवार दि. १९ मे सायंकाळी ५.३० वा. र.भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई च्या प्रांगणावर होणार आहे. या प्रसंगी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार, राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे,

▶▶ उर्वरित पान २ वर



### चांगले काम करणार्या शिवछत्र परिवारा सोबत राहणार – महेश दाभाडे

**शिवछत्र परिवाराने कधीही सुडाचे राजकारण केले नाही, ज्यांच्या विरोधात मी लढलो त्यांनी मला जवळ केले हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. भैय्यासाहेब आणि विजयसिंह पंडित ग्राऊंड लेवलला राहुन काम करतात, त्यांना सामान्यांच्या प्रश्नांची जाण आहे. माझ्या सोबतच्या कार्यकर्त्याला राजकारणात सन्मानाचीवागणुक मिळावी यासाठी शिवछत्र परिवारासोबत भविष्यात काम करणार असल्याचे माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांनी यावेळी सांगितले.**

# जिल्हापरिषद सदस्य निश्चितीसाठी मागविली माहिती

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या संदर्भाने आता निवडणूक आयोग आणि राज्य सरकारच्या पातळीवर हालचालींना वेग आला आहे. जिल्हापरिषदांमधील सदस्यांची संख्या निश्चित करण्यासाठी तसेच प्रभाग रचनेला वेग देण्यासाठी निवडणूक आयोगाने राज्य सरकारला निर्देश दिल्यानंतर राज्याच्या ग्रामविकास विभागाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना जिल्ह्यातील लोकसंख्या, ग्रामीण लोकसंख्या आणि इतर माहिती तात्काळ देण्याचे निर्देश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या संदर्भाने राज्य निवडणूक आयोग आणि

▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

## घरमालकांनो घर भाड्याने देण्यापूर्वी 'ही' बातमी वाचा...

# अन्यथा भाडेकरू बनू शकतो घराचा मालक



तुम्ही तुमचं घर किंवा दुकान भाड्याने देत असाल, तर ही माहिती तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. 1963 च्या 'मर्यादा कायदा'नुसार, जर मालकाने १२ वर्षांपर्यंत मालमत्तेवर मालकीचा हक्क सिद्ध केला नाही, तर भाडेकरू त्या मालमत्तेचा मालक बनू शकतो. भारतभरात अनेक लोक मालमत्ता भाड्याने देऊन उत्पन्न मिळवतात. पण काही कायदेशीर बाबींकडे दुर्लक्ष केल्यास घरमालकांची मोठी फसवणूक होऊ शकते.

'प्रतिकूल ताबा' (Adverse Possession) म्हणजे काय? :

जर एखादा भाडेकरू मालमत्तेचा ताबा १२ वर्षांहून अधिक काळ घेत असेल आणि या काळात मालकाने ताबा परत घेण्यासाठी कोणतीही कारवाई केली नाही, तर भाडेकरू कोर्टात मालकी हक्कासाठी दावा करू शकतो. या प्रकरणात भाडेपट्टा संपल्यानंतरही जर मालक निष्क्रिय राहिला, तर कायद्यानं भाडेकरूला त्या संपत्तीचा मालक मानलं जाऊ शकतं.

Property Law | घरमालकांसाठी महत्त्वाचे कायदे : 1963 चा मर्यादा कायदा: खाजगी मालमत्तेसाठी ताबा सिद्ध करण्याची कालमर्यादा १२ वर्षे.

सरकारी मालमत्तेसाठी: जर कोणी सरकारी जागेत ३० वर्षे सातत्याने ताबा ठेवला, तर त्यालाही मालकीचा दावा करण्याचा अधिकार असतो.

वेळोवेळी ताबा सिद्ध करणं, घरभाडे करार (Rent Agreement) नवीन करून घेणं, आणि भाडे नियमित घेणं हे घरमालकांनी लक्षात ठेवणं आवश्यक आहे. तुमचं घर भाड्याने देताना ही काळजी घ्या : – दर वर्षी भाडे कराराचा नूतनीकरण करा.

– भाडे पावत्या व व्यवहारांचे पुरावे जतन ठेवा.

– मालमत्तेवर नियमित भेट देत ताबा कायम असल्याचं लक्षात ठेवा.

– एखाद्या कारणास्तव मालमत्ता रिकामी न करता भाडेकरूचे अधिकार मर्यादित ठेवा.

भारतात अशा अनेक केसेस समोर आल्या आहेत जिथे मालकाच्या निष्क्रियतेमुळे भाडेकरूने मालकी हक्क मिळवला आहे. त्यामुळे घरमालकांनी कायदेशीर दक्षता घेणं हे काळाची गरज आहे.

पान ४ वरून पुढे...

### धनंजय मुंडेंनी...

मारहाण केलेल्या संपूर्ण ठोक्यावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी यावेळी धनंजय मुंडे यांनी केले असून. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी यासंदर्भात ठोस भूमिका घेतली आहे पुढे तपासांती सर्व गोष्टी स्पष्ट होतील. तसेच या प्रकरणात कुठेही जाती धर्माचा काहीही संबंध येत नाही असे स्वतः एसपींनी देखील स्पष्ट केले असल्याचे धनंजय मुंडे यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले. आपण शिवराज व दिवटे कुटुंबीयांच्या पाठीशी आहोत, पोलीस योग्य तो तपास करतील आणि आरोपींना कठोर शिक्षा मिळेल, असा विश्वास असल्याचे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले. यावेळी माजी आ.संजय दौंड, ज्येष्ठ नेते राजकिशोर मोदी, रा कॉ चे तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, विश्वंभर फड, भागवत तावरे यांसह आदी उपस्थित होते.

### राज्यव्यापी कर्जमुक्ती...

शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या सरकारने वेळीच दखल घ्यावी अन्यथा मुंबईतील मंत्रालयात मंत्र्यांना दालनाताच घेराव घालू कुठल्याही परिस्थितीत राज्यातील शेतकरी कर्जमुक्त होईपर्यंत आंदोलन चालूच ठेवणार असल्याच्या निर्धार रविकांत तुपकरांनी व्यक्त केला. कर्जमुक्ती मेळाव्याच्या संयुक्त अध्यक्षस्थानी ह.भ.प. लालासाहेब नाना पवार व देवळ्याचे सरपंच रावसाहेब नाना यादव होते. कर्जमुक्ती मेळाव्याला विशेष अतिथी म्हणून शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदास आपेट , बीड जि. प.माजी शिक्षण व आरोग्य सभापती राजेसाहेब देशमुख, राष्ट्रीय कॉंग्रेस चे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे ,क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे ,जेष्ट शेतकरी नेते अच्युत गंगणे , राज्य कोअर कमिटीचे सदस्य सत्तार पटेल ,लातूर जिल्हाध्यक्ष अरुण कुलकर्णी , मराठा सेवा संघाचे बीड जिल्हाध्यक्ष नागनाथ जाधव ,संभाजी ब्रिगेडचे बीड पूर्व जिल्हाध्यक्ष प्रवीण ठोंबरे,शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनुरथ काशीद ,नवनाथ शिंदे,रामराम बाबा लोमटे, विष्णु काका शिंदे , आदी मान्यवर उपस्थित होते.या मेळाव्याचे प्रास्ताविक निमंत्रक क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी केले .तर अरुण आबा पवार ,भास्कर आगळे ,नारायण मुळे ,ऍड. राजेश शिंदे यांनी परिश्रम घेतले.

बीड जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या वाढल्या असून शेतकरी विरोधी धोरणामुळे शेतकऱ्यांचे मरण दारात आहे अशा परिस्थितीमध्ये पक्षीय अभिनिवेश न बाळगता आम्ही शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभा राहू व शेतकरीची चळवळीची वज्रमूठ अवळू असे आश्वासन बीड जि.प.चे माजी शिक्षण सभापती राजेसाहेब देशमुख यांनी दिले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी न्याय मिळवण्यासाठी शेतकरी संघटनेने दिलेल्या एक कलमी कार्यक्रमाची कृती करण्याची गरज असून देवळा परिसरात यापूर्वी झालेल्या ऐतिहासिक ऊसाच्या झोनबंदी आंदोलनाच्या आठवणी जाग्या करून आगामी कर्जमुक्ती आंदोलनात मांजरा बेल्ट मधील शेतकरी मागे राहणार नाहीत याची दक्षता घेण्याचे शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी आवाहन केले.

गावगाड्यातील सामान्य शेतकऱ्यांच्या तरुण पोरांनी आगामी कर्जमुक्तीच्या आंदोलनात उतरून आपल्या मायबाप शेतकऱ्यांना आत्मसन्मान मिळविण्यासाठी हीच एकत्र येण्याची योग्य वेळ आहे.आपण सर्वच युवा शेतकऱ्यांनी हे आंदोलन ताकदीने पुढे नेण्याचे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी प्रास्ताविकात केले.

### गेवराई: तय्यबनगरातील...

यांच्यावर कडाडून टीका करत मुस्लिम समाजासोबत दुजाभाव केल्याचा संतप्त सवाल उपस्थित केला.एजाज यांनी म्हटले की, माजी.आ अमरसिंह पंडित यांनी तय्यबनगरातील रहिवाशांना भावनिक करत पीटीआर मिळवून देण्याचे आश्वासन दिले आणि कार्यकर्त्यांकडून फॉर्म भरवून घेतले. मात्र, आता हा भाग विसरला गेला. जर इनामी जागेचे पीटीआर होऊ शकत नसतील, तर खोटी आश्वासने देऊन जनतेला मुर्खात का काढले? तय्यबनगरातील सर्व मुस्लिम समाजाला जाणीवपूर्वक षडयंत्रातून वंचित ठेवले, असे एजाज यांनी ठणकावले. त्यांनी माजी.आ.अमरसिंह पंडित यांना मुस्लिमांचे वावडे संबोधत, मुस्लिमांच्या पाठीत खंजीर खुपसण्याची त्यांची जुनी कार्यपद्धती असल्याचा घणाघात केला.उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यावरही एजाज यांनी निशाणा साधला. अजितदादांनी संजयनगर, साठेनगर येथे पीटीआर वाटप केले, पण तय्यबनगरातील गरिबांना का विसरले? हा मुस्लिम समाजासोबतचा भेदभाव आहे, अशी टीका त्यांनी केली. तय्यबनगरातील रहिवाशांमध्ये संतापाची लाट उसळली असून, लवकरच आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणी पंडित आणि पवार यांनी तातडीने पीटीआर का मिळाले नाही याबाबत स्पष्टीकरण द्यावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी दिला आहे.

### सोनाजीराव क्षीरसागर...

योजना प्रतिनिधी ओम आगरकर, तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी रमेश थोरात, ओम आगरकर, प्रद्युम्न डहाळे यांनी परिश्रम घेतले.

### भारतीय सैन्यांचे...

सदरील रॅली छत्रपती संभाजी महाराज चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, हनुमान चौक, झेंडा चौक मार्गे आंबेडकर नगर पर्यंत तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये भाजपचे माजी अध्यक्ष अरुण राऊत डॉ अशोक तिडके ज्ञानेश्वर मेंडके शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले अच्युतराव लाटे, अमरनाथ खुरपे भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ प्रशांत पाटील, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी गोविंद बजाज प्रकाश दुगड शशीकिरण गडम अभय कोकड , बंडू खांडेकर, ईश्वर अप्पा खुरपे रूपालीताई कचरे डॉ. अभिजीत सोळंके माऊली सरवदे प्रल्हाद दळवे शरद कचरे आनंत कुलकर्णी निरंजन वाघमारे सत्यनारायण उनवणे विनायक रत्नपारखी अविनाश कांडुरे पांडुरंग झोडगे उमेश जाधव राम शिंदे नवनाथ गायकवाड सुभाष साळवे सुभाष कांबळे खय्यम पठाण कल्याण शेप पवन मोगरेकर रमेश शेंडगे मनोज कोरडे नामदेव मुळे यांच्यासह भारतीय जनता पार्टी, शिवसेना ,राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्ष, माजी सैनिक, ज्येष्ठ नागरिक महिला यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. रॅलीत सहभागी सर्वांनी तिरंगा ध्वज हातात फडकवत या रॅलीने शहरवासी यांचे लक्ष वेधले. आंबेडकर नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून रॅलीचा समारोप करण्यात आला.

### ना.अजितदादांचे...

श्री मोहनराव जगताप यांचा पक्षात प्रवेश झाल्याने प्रा.ईश्वर मुंडे यांना संधी मिळाली नाही. या नाराजीने प्रा.ईश्वर मुंडे यांनी माजलगाव विधानसभेची निवडणूक अपक्ष लढवून रंगत आनली होती परंतू शेवटच्या टप्प्यात आ.जयंतराव पाटील यांच्या विनंतीवरून खा.सुप्रीयाताई सुळे यांच्या माजलगाव येथील जाहीर प्रचार सभेत पक्षाचे उमेदवार श्री.मोहनराव जगताप यांना पाठींबा देवून त्यांच्या विजयासाठी प्रयत्न केले होते. आपण राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे माजलगाव मतदारसंघ व बीड जिल्ह्यात प्रमाणीक पणे केलेले काम खा.शरदचंद्र पवार साहेब व आ.जयंतराव पाटील साहेब यांना वास्तव सांगणारे मोठया मनाचे नेतृत्व बीड जिल्ह्यात नसल्यामुळे व पक्ष संघटनेपेक्षा स्वत:ची मानसे निर्माण करण्याचे राजकारण बीड जिल्ह्यात सुरू असल्यामुळे आपण खा.शरदचंद्र पवार साहेब यांना सोडून जड अंत:करणाने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर आबा चव्हाण यांच्या विनंतीवरून श्री रमेशराव आडसकर यांच्यासोबत वानखडे स्टेडियम, मुंबई येथे ना.अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात ना.अजितदादा पवार,खा.सुनीलराव तटकरे यांच्या हस्ते पक्षात प्रवेश केला असल्याचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी केज येथील पक्ष नोंदणी कार्यक्रमात आपल्या भाषणात सांगितले.

पुढे बोलताना प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले की,रमेशराव आडसकर हे कार्यकर्त्यांना पद व प्रतिष्ठा मिळवून देणारे नेते आहेत या मुळे आपण त्यांच्या नेतृत्वाखालील पक्ष वाढीचे काम करून सर्व नव्या जुन्यांना सोबत घेऊन जन हिताची कामे करत राहणार आहोत. या वेळी स्टेजवर श्री रमेशराव आडसकर,ड.राजेश्वर आबा चव्हाण,श्री.अंकुशराव इंगळे,श्री.दिलीपराव गुळभिले,श्री.ऋषिकेश आडसकर, श्री.राजाभाऊ औताडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

पान १ वरून पुढे...

### निराधार लाडक्या...

त्यांना कोणाचे मार्गदर्शन ना मदत मिळत नाही. दलालांचा सुळसुळाट असून गोरगरीब जनतेकडे पैशाचे शोषण होत आहे. दलाला शिवाय पान हलत नाही. गर्दीत घुसमटून एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाला. परंतु अद्याप प्रशासनाला जाग आली नाही. नियमितपणे संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची वाटपाची व्यवस्था यापूर्वीच निर्धारित असताना पुन्हा कागदपत्रांची पडताळणीच्या नावाखाली गोरगरीब जनतेला वेठीस धरले जात आहे. यापूर्वीच मंजुरी प्राप्त व अनुदान प्राप्त लाभार्थ्यांच्या पगारी रोखून त्यांच्या वरती अन्याय करण्याचे पाप शासन व प्रशासनाने कदापि करू नये. अनुदानावर अनेक गोरगरीब जनतेचे प्रपंच अवलंबून असून अन्न व औषधा विना त्यांचे हाल होत आहेत. लाडक्या बहिणींना खुश करण्याच्या तंद्रीत लाडक्या आजी नाही शासनाने तातडीने त्यांच्या हक्काची मदत वाटप करावी.

### उपमुख्यमंत्री तथा...

वस्तीगृहाच्या नूतनीकृत इमारतीची पाहणी. नंतर स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय बी-बिल्डींग सर्जिकल वार्ड व नूतन मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे लोकार्पण. नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी ११.३० वाजता श्री. राजकिशोर मोदी यांचे निवासस्थान, गुरुवार पेठ, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी ११.३० ते १२.३० राखीव.दुपारी १२.४५ वाजता कृषी महाविद्यालय अंबाजोगाई येथील हेलिपॅड येथे आगमन. दुपारी १२.५० वाजता हेलिकॉप्टरने बीडकडे प्रयाण. दुपारी १.१५ वाजता पोलीस परेड ग्राउंड येथील हेलिपॅड पोलीस मुख्यालय बीड येथे आगमन. नंतर मोटारीने प्रयाण.दुपारी १.२० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आगमन. दुपारी १.३० वाजता बीड जिल्हा नियोजन समितीची बैठक. दुपारी ३.३० वाजता बीड जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व सन २०२५-२६ आढावा बैठक. सायं. ४.३० वाजता बीड जिल्ह्यातील विविध विकासकामे तथा योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक. नंतर पत्रकार परिषद. त्यानंतर मोटारीने गेवराईकडे प्रयाण. सायं ७.०० वाजता कृष्णाई निवास, जुन्या बस स्टँड समोर, गेवराई जिल्हा बीड येथे आगमन. सायं ७.०० वाजता राखीव . नंतर मोटारीने प्रयाण. सायं ७.३० वाजता आर.बी. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई जिल्हा बीड येथे आगमन. सायं ७.३० वाजता विविध विकास कामांचा शुभारंभ. नंतर राखीव. रात्री ९.४५ वाजता मोटारीने छत्रपती संभाजीनगर कडे प्रयाण.

### खा. बजरंग सोनवणेंची...

झालेला परळी पॅटर्नचा बिमोड करण्यासाठी विशेष आयपीएस अधिकारी नेमून येथील गुंडगीरी मोडीत काढावी, अशी मागणीही खा.सोनवणे यांनी केली.

दोन दिवसांपुर्वी परळीतील अमानूष मारहाणीचा व्हिडीओ समोर आला होता. यात शिवराज टिवटे यास मारहाण करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान, अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात शिवराज दिवटे या तरूणावर उपचार सुरू आहेत. त्याठिकाणी जावून त्याच्या तब्येतीची विचारपूस केली आणि त्याला मिळत असलेल्या उपचाराबाबत संबंधित डॉक्टर व रुग्णालयाचे अधिष्ठाता यांचेकडुन माहिती घेतली. दिवटे कुटूंबियांना धीर दिला. त्यानंतर केज-अंबाजोगाई रोडवर झालेल्या कंटेनर अपघातात जखमी झालेल्या रुग्णांचीही भेट घेतली. डॉक्टरांशी चर्चा करून सगळ्यांना योग्य ती वैद्यकीय मदत मिळतेय ना, याची खातरजमा केली. यावेळी बोलताना खा.सोनवणे म्हणाले, परळी व परिसरात दहशतीचा धंदा निर्माण करण्याकडे नवतरुणांचा कल वाढत आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. हे थांबवायचे असेल तर कायद्याचे राज्य स्थापण होणे गरजेचे आहे. या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी एक स्वतंत्र आयपीएस अधिकारी नेमण्यात यावा, परळीतील सर्वच वादग्रस्त पोलिस अधिकारी यांच्या तातडीने बदल्या कराव्यात, ऋशिवराज दिवटे प्रकरणातील सर्व आरोपींवर कठोरात कठोर शासन करावे, अशा मागण्या राज्य सरकारकडे करत आहे. तर दिवटे परिवाराला पोलिस संरक्षण देण्यात यावे. त्यांना रूग्णालयातही धमकावण्याचे काम सुरू आहे. त्याकडे पोलीस प्रशासनाने गांभिर्याने पहावे अशी मागणी केली. राज्य सरकारकडे करण्यात आलेल्या मागण्या आज संध्याकाळपर्यन्त मान्य कराव्यात, अन्यथा बीड जिल्हा उद्या बंद करण्यासाठी जिल्हा बंदची हाक देण्यात येईल, असा इशाराही यावेळी खा.सोनवणे यांनी दिला. याच बरोबर बीड जिल्ह्यामध्ये जे चाललंय ते अत्यंत दुर्दैवी आहे. बीड जिल्ह्यात अनेक घटना घडतात की या गुन्ह्यांची पाळेमुळे परळीतील विशिष्ट लोकांच्याकडे सापडतात. अतिशय वाईट कृत्य करणारे तरुण परळी शहरात आणि परिसरात तयार होत आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे. स्व. संतोष देशमुख यांचे ज्या दिवशी अपहरण आणि मर्डर झाला त्या दिवसापासून मी संसदेत व बाहेर आवाज उठवत आहे. सर्व आमदार आणि सामाजिक कार्यकर्ते बोलत आहेत, मात्र या गुंड प्रवृत्तीला रोखण्यासाठी पोलिसांनी क्रियाशील पुढाकार घ्यायला हवा, असेही खा.सोनवणे म्हणाले.

परळी पॅटर्नसाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे आयपीएस लेव्हलचा एक विशेष अधिकारी नेमण्यात यावा अशी मागणी करणार आहे.परळी मध्ये १९९२ पासून सत्तेने मस्तावलेली प्रवृत्ती आहे. सत्तेचा राजाश्रय मिळत असल्याने हे लोक दादागिरी आणि गुंडगिरी करीत आहेत.

बोगस पिकविमा उचलण्यातही हेच लोक- बोगस पिकविम्याचे लाखो नव्हे तर करोडो रुपये काही धेंडानी उचलले आहेत. नांदेड, लातूर, परभणी अशा चारपाच जिल्ह्यात बोगस पीकविमा भरला आहे. याची सर्वांकडे ऑफलाईन पद्धतीने तक्रार केलेली आहे, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी बीड जिल्ह्याच्या गृहखात्यावर आणि जेल प्रशासनावर बोलले पाहिजेत. बीडचे जेल प्रशासन हे जास्तच बोगस प्रशासन आहे, याचा उल्लेखही खा.सोनवणे यांनी केला.

### पाकिस्तान सारख्या....

सुरुवातीस माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी श्री.अंकुश खोटे यांनी स्वर्गीय पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची.. ये भारत कोई भूमिका टुकडा नही, ये वंदन की धरती है अभिनंदन की भूमी है.. ही कविता ऐकवली..सेवानिवृत्त मेजर श्री.भोसले यांनी प्रास्ताविक केले.. या संपूर्ण शौर्य तिरंगा यात्रेचे सूत्रसंचालन सूत्र बाळासाहेब तळेकर यांनी केले..

पुढे बोलताना आ.सुरेश धस म्हणाले, २२ एप्रिल रोजी काश्मीर मधील पहलगाम परिसरातील बैसरन व्हॅलीमध्ये पर्यटनाला गेलेल्या भारतीय नागरिकांना विशेषतः पुरुषांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या घालून मारण्यात आले..

कुटुंबीयां देखत, पत्नी समोर ,मुलाबाळांवर समोर..विशेषतः केवळ पुरुषांना क्रूर पद्धतीने गोळ्या घालून मारण्यात आले ही अत्यंत अमानवी कृती होती त्यामुळे या पाकिस्तान पुरस्कृत आतंकवाद्यांना आणि पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी अत्यंत विचारपूर्वक योजना आखून पाकिस्तानला धडा शिकवला आहे दि.६ मे च्या रात्री

अगोदर पहिल्या दिवशी शंभर ते दीडशे दहशतवाद्यांना कंठस्नान घालून दुसऱ्या दिवशी दि.७ मे रोजी केवळ २३ मिनिटांमध्ये पाकिस्तानातील प्रमुख नऊ हवाई तळ उध्वस्त करून भारतीय सैन्याने पराक्रमाची गाथा लिहिली आहे..अफगाणिस्तान,अरब अमिराती, या मुस्लिम राष्ट्रांनी आणि दोन तीन देश वगळता..

संपूर्ण जगाने भारताला पाठिंबा दिला आहे.. पाकिस्तानला केवळ तुर्की आणि अझरबैझान या भिकारी राष्ट्रांनी पाठिंबा दिला आहे..

भारतावर यापूर्वी दहशतवादी हल्ले झाले ..२६/११ हा भारत देशावरील हल्ला होता, मुंबई शहरात बॉम्ब स्फोट झाले शेकडो नागरिक मारले गेले.. परंतु तात्कालीन भारतीय पंतप्रधानांकडून केवळ निषेध व्यक्त झाला.. पाकिस्तानला चोख उत्तर देण्यात आले नव्हते..

परंतु आता भारत बदललेला आहे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सैन्य दलाला सूट दिलेली आहे मोकळीक दिलेली आहे काही दिवसांपूर्वी याच तुर्कस्तानमध्ये भूकंप झाला असता त्यावेळी त्यांना वैद्यकीय मदत देणारा पंतप्रधान मोदींचा भारत देश हाच सर्वात पुढे होता मात्र तुर्की देशाने या मदतीची उपकाराची परतफेड अपकाराने केली असून पाकिस्तानला मदत केली आहे

पाकिस्तान कडे शस्त्र नाहीत शस्त्र घ्यायला पैसे नाहीत प्रचंड कर्जबाजारी असल्यामुळे आज पाकिस्तानात महागाईने कहर केला असून जीवनावश्यक वस्तू घेण्यासाठी हजारो रुपये मोजावे लागत आहेत पाकिस्तानचे सैन्यदल देखील सैन्यदल राहिले नसून ते अतिरेकी झाले आहेत सैन्यदल आणि अतिरेकी यांच्यात काहीही बदल राहिलेला नाही ...असे सांगत भारतीय जवानांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ही शौर्य तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली आहे आणि यामध्ये मतदारसंघातील हुतात्मा झालेल्या वीर सैनिकांच्या कुटुंबीयांचा सन्मान या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे असे सांगितले या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेले त्रिदल माजी सैनिक संघटना, नागरिक, व्यापारी, विद्यार्थी विद्यार्थिनी ,यांचे त्यांनी मनापासून आभार मानले आष्टीच्या पंचायत समिती येथील हुतात्मा स्मारकापासून हुतात्मा जवानांच्या वीर पत्नी वीर माता यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारत मातीची प्रतिमा असलेला अश्वारूढ रथ लक्ष आकर्षण घेत होता बँड पथकाच्या निनादात देशभक्तीच्या नया भारत का जलवा देखा, पाकिस्तान ने मलबा देखा, हिंद की सेना ने भरी हुंकार.. पाकिस्तान मे मचा हाहा:कार.. घर मे घुसकर मारा है, आतंक का भूत उतारा है, जो हिंदुस्तान से टकरायेगा,चूर चूर हो जायेगा... घर मे घुसकर मारा है, आतंक का भूत उतारा है.. जो हिंदुस्थानको टकरायेगा.. चुरचुर हो जाएगा, सिंदूर का हिसाब चुकाया है, पाकिस्तान को सबक सिखाया है, अशा राष्ट्रभक्तीपर देशप्रेमाने भारलेल्या घोषणांनी आष्टी नगरी दुमदुमून गेली होती.. यावेळी हजारो नागरिक या शौर्य तिरंगा यात्रेत सामील झाले असल्याने संपूर्ण आष्टी शहरातील नागरिकांचे या तिरंगा यात्रेने लक्ष वेधले..

ही संपूर्ण शौर्य तिरंगा यात्रा यशस्वी करण्यासाठी आ.सुरेश धस मित्र मंडळ,त्रिदल सैनिक संघटना,आजी माजी सैनिक यांनी खूप मोठे परिश्रम घेतल्याने ही शौर्य तिरंगा यात्रा यशस्वी झाली. तर या भव्य दिव्य तिरंगा यात्रेत प्रमुख पदाधिकारी, आजी माजी सैनिक यांच्यासह देशप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ.सुरेश धस यांनी हातात तिरंगा ध्वज घेत दिल्या घोषणा-आष्टी शहरातील भव्य दिव्य तिरंगा यात्रेत हजारो देश प्रेमी आपल्या हातात तिरंगा ध्वजा घेऊन या रॅलीमध्ये सहभागी झाले होते तर या रॅलीत आमदार सुरेश धस यांनी देखील तिरंगा ध्वजा हातात घेऊन भारतीय सैन्य दलाचा विजय असोभारत माता की जयपाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा देत स्वतः सहभागी होत देशाच्या सीमेवर सेवा करणाऱ्या सैनिकांचे व रॅलीत सहभागी देशप्रेमीचे मनोबल वाढवले.

### अजितदादा पवार...

माजीमंत्री आ. धनंजय मुंडे, जयभवानी सह. सा. कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, आ. सतिष चव्हाण, आ. विक्रम काळे, माजी आमदार बाळासाहेब आजबे, राष्ट्रवादी कॉंग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुनिल मगरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख स्वप्निल गलधर यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत. या निमित्ताने आयोजित केलेल्या सभेला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. या बाबत आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पत्रकार परिषदेला आ. विजयसिंह पंडित यांच्या सह महेश दाभाडे, बीडचे माजी नगरसेवक निजाम शेख, सचिन मोटे, कृष्णा मुळे , मंजुर बागवान, विलास सुतार, राधेशाम येवले, किशोर कांडेकर यांच्यासह मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

यावेळी बोलतांना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान दिलेल्या आश्वासनाची पुर्तता करण्याचे काम प्रमाणिकपणे सुरु आहे. अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई शहरातील अनेक विकासाची प्रलंबित कामे पुर्ण होत असल्याचा आनंद आहे. शहरातील गोर-गरीबांचे अतिक्रमण नियमाकुल करण्याचे काम आम्ही केले, या पुर्वीच्या सत्ताधार्यांनी स्वता:ची अतिक्रमणे नियमाकुल करण्यासाठी सत्तेचा वापर केला. अनेक वर्षापासुन प्रलंबित असलेला शहराच्या हद्दवाढीचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार असल्याची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी दिली. माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे व त्यांच्या सहकार्यांच्या पक्ष प्रवेशाची घोषणा पत्रकार परिषदेत आ. पंडित यांनी केली.

### जिल्हापरिषद सदस्य...

राज्यशासनाला निर्देश दिल्यानंतर आता महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी हालचाल सुरु झाली आहे. निवडणूक आयोगाने राज्य सरकारला प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले आहेत, त्याअगोदर जिल्हापरिषदाचं ी सदस्य सख ं या निश्चित करण्यास सा ंगितले आहे. त्यानुसार राज्याच्या ग्रामविकास विभागाने आता सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून सदस्यसंख्या निश्चित करण्यासाठी ग्रामीण लोकसंख्या, वेगवेगळ्या तालुक्यातील ग्रामीण क्षेत्र आणि ग्रामीण लोकसंख्येत काही बदल झाले असल्यास ती माहिती तातडीने द्ेणे याचे निर्देश दिले आहेत . त्यामुळे आता येत्या काही दिवसांमध्ये राज्यातील जिल्हापरिषदांची सदस्यसंख्या निश्चित होणार आहे. त्यानंतर जिल्हापरिषद , पंचायत समिती गट गण रचना , त्यानंतर आरक्षण सोडत आणि पुढील कार्यक्रम होणार आहेत

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# चालक वाहकाला मारहाणीनंतर बीडमध्ये अडीच तास थांबली एसटीची चाके

**बीड । प्रतिनिधी**

एका रिक्षा चालकासोबत झालेल्या कुरबुरीनंतर शहराच्या बार्शीनाका भागात एसटीच्या चालक वाहकांना जमावाने मारहाण केल्याचा प्रकार समोर आला. या प्रकारानतं र बीडमधील एसटीच्या चालक वाहकांनी थेट आंदोलनच सुरु केले. तब्बल अडीच तास बीडमध्ये एसटीची चाके थांबली. चालक वाहक आपापल्या बस सोडून घटनेचा निषेध करत असल्याचे चित्र निर्माण झाले. यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल झाले तर आधीच वदर्ळ ीच` ठिकाण आणि त्यात बस थेट रस्त्यावर उभ्या राहिल्यामुळे वाहतुकी कोंडीला सुरुवात झाली असून वाहतूक शाखेचे सपोनि सुभाष सानप व त्याचं ी टीम रस्त्यावर उतरली .मात्र लालपरीची चाक थांबल्याने प्रवाशांचा जीव मेटाकुटीला आला . सायंकाळी उशिरा एसटीची वाहतूक सुरळीत झाली होती. मांजरसुम्भा येथे एका बसमधील चालक आणि वाहकाला एका रिक्षा चालकाने

## प्रवाशांचे प्रचंड हाल



शिवीगाळ केली हाते ी.त्यानतं र बार्शी नाक्यावरही पु ुहा असाच प्रकार घडला.यावळे ी बसच्या काचा फोडण्यात आल्या असून चालक आणि वाहकाला धक्काबुकी झाल्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनेने आक्रमक भूमिका घेत बस जाग्यावरच उभ्या करण्याचा निर्णय घेतला.त्यामुळे मागील एक ते दीड तासापासून रस्त्यावरच बस उभा राहिल्या असून प्रवाशी तात्काळले आहेत.पेठ बीड पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असताना एसटी कर्मचाऱ्यांनी घेतलेली भूमिका प्रवाशी वर्गासाठी मेटाकुटीला आणणारी ठरली.

### • नियम फक्त खाजगी वाहतूकदारांना

**जालना रोडवर विशेष करून अण्णाभाऊ साठे चौकाच्या पुढे रात्री १० पर्यंत एकही खाजगी गाडी उभा राहिली तरी त्या बसेसवर तात्काळ कारवाई होती. वाहतूक शाखा आणि आरटीआचे पथक या वाहनावं र कारवाइर्स ाठी सक्रि य असल्याचे अनेकदा समोर आले. वर्दळीच्या ठिकाणी बस उभ्या राहिल्या तर वाहतूकदारांना मोठी अडचण होती त्यामुळे १० च्या आत एकही ट्रॅव्हल्स चालकांनी गाडी या रस्त्यावर आणू नये याच्या सक्त सूचना आहेत पण आता मागच्या दीड तासापासून रस्त्यावरच उभ्या असलेल्या बसेसवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसून प्रवासी वर्ग मात्र मेटाकुटीला आल्याचे चित्र आहे.**

## माजलगावात सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांच्या नागरी सत्काराचे आयोजन - स्वागताध्यक्ष श्रीहरी नाना मोरे, सचिन डोंगरे यांची माहिती

**माजलगाव । प्रतिनिधी**

राज्याच्या सामाजिक न्याय मंत्रीपदी तथा छत्रपती संभाजी नगरच्या पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल ना. संजय सिरसट यांच्या नागरी सत्काराचे आयोजन माजलगाव येथे दि. २४ शनिवार रोजी बहुजन समाजाच्या वतीने करण्यात आले असल्याची माहिती स्वागताध्यक्ष तथा बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे, सचिन डोंगरे यांनी दिली आहे. शहरातील जुना मोंढा येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास बहुजन नेते बाबुराव पोटभरे, आमदार धनंजय मुंडे,



आमदार प्रकाश सोळंके, आमदार सुरेश धस, आमदार विजयसिंह पंडित, आमदार नमिता मुंदडा, शिवसेनेच्या युवा नेत्या हर्षदा सिरसट यांची उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमाचे निमंत्रण ना. संजय शिरसट यांना देत उपसभापती श्रीहरी नाना मोरे, नवनाथ धाईजे, भीमराव टाकणखार यांनी त्यांचा सत्कार केला. याच कार्यक्रमात दुपारी चार वाजता गायनाचा कार्यक्रम पेढे तुला व नागरी सत्कार असा भव्य दिव्य कार्यक्रम होणार असून कार्यक्रमास उपस्थित रहा असे आवाहन राजेश साळवे, प्रशांत ससाने, शहराध्यक्ष राहुल मस्के, अशोक लांडगे, प्रदीप पट्टेकर, वसंत वाव्हळकर, बाबा शेख, फेरोज शेख, विजय धाईजे, विनोद शिंदे, अभिजीत पोटभरे, अक्षय मोरे, सदानंद प्रधान, बाबा वाघमारे, नितिन काळे, किरण खळगे, विजय साळवे, धर्मा मोरे, आकाश माने, दीपक टाकणखार, जयदीप तांगडे, विठ्ठल पंडित, लखन हजारे यांनी केले आहे.

## धोंडराईच्या सरपंच शितल साखरे लोकमत सरपंच अवॉड्‌र्स– उद्योन्मुख आदर्श सरपंच या पुरस्काराने सन्मानीत

### ▸आदर्श सरपंच वितरण सोहळा संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

लोकमत सरपंच अवॉर्ड्सच्या राज्यस्तरीय वितरण समारंभात धोंडराई ग्रामपंचायतीच्या सरपंच शितल ताई साखरे यांना 'उद्योन्मुख आदर्श सरपंच पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

बीड शहरातील अंबिका चौक चक्रधर नगर भागातील सौभाग्य लॉन्स या ठिकाणी १७ मे रोजी आयोजित कार्यक्रमात त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला या पुरस्कारासाठी बीड



जिल्ह्यातील विविध तालुक्यातील ८२ ग्रामपंचायतींचा समावेश असलेली स्पर्धा होती. ज्युरी मंडळाने त्यातील उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या सरपंचांची निवड केली. पाटोदा गावाचे आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील यांनी या सोहळ्याला उपस्थित राहून ग्राम पंचायत कशी असावी या विषयावर बीड जिल्ह्यातील सरपंच ना मार्गदर्शन केले धोंडराईच्या सरपंच शितल साखरे यांनी जलसंधारण, महिला सक्षमीकरण, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, पारदर्शक प्रशासन, डिजिटल ग्रामविकास या विविध क्षेत्रांमध्ये भरीव कामगिरी बजावली. त्यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायतीने अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत. त्यामुळेच त्यांना 'आदर्श सरपंच' म्हणून राज्यपातळीवर गौरविण्यात आले.या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवणे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे प्रमुख उपस्थित होतें. या सर्व मान्यवरांनी शासकीय योजना व इतर विषयांवर मार्गदर्शन केले.या पुरस्कारामुळे धोंडराई ग्रामपंचायतीच्या कार्याची दखल राज्यस्तरावर घेतली गेली असून, या यशाचे आनंद संपूर्ण ग्रामपंचायत टीमसह ग्रामस्थांना होत आहे.

## इंजि. देविसिंह शिंदे यांच्या पाठपुराव्याला पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांची साथ

### एकाच दिवसात पासपोर्ट विभागातील सर्व प्रलंबित प्रस्ताव मार्गी

**बीड । प्रतिनिधी**

डिजिटल सिग्नेचरच्या तांत्रिक कारणामुळे मागील दीड महिन्यापासून पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये पासपोर्टचे प्रस्ताव प्रलंबित होते. अनेकांना यासाठी चकरा माराव्या लागत होत्या. या प्रश्नी पोलीस अधीक्षकांना निवेदन दिल्यानंतर त्यांनी तात्काळ या प्रकरणी लक्ष घालून डिजिटल कारवाई संदर्भात निर्देश दिले.

स्वत: देविसिंह शिंदे हे सॉफ्टवेअर इंजिनिअर असल्याम ुळे त्यांनी तांत्रिकदृष्ट्या सक्षम व योग्य पाठपुरावा केल्यामुळे डिजिटल सिग्नेचरचा तांत्रिक बिघाड लवकर दुर होऊन एकाच दिवसात बीड जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयातील पासपोर्ट



विभागातील सर्व प्रलंबित प्रस्ताव मंजुर होऊन पुढे दाखल झाले व मार्गी लागल्याची विक्रमी काम गिरी बीड जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच झाली. त्यामुळे कालच दि. १६/०५/२०२५ वार शुक्रवार रोजीच गेल्या अनेक दिवसांपासून पोलीस अधिक्षक कार्यालयातील पासपोर्ट विभागात प्रलंबित असलेले पासपोर्टचे सर्व प्रस्ताव मंजुर होऊन पुढे दाखल होत मार्गी लागले आहेत, अशी माहिती जिजाऊ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष इंजि. देविसिंह शिंदे यांनी दिली. या संदर्भात त्यांनी सांगितले की, गेल्या दीड महिन्यापासून पोलीस अधिक्षक कार्यालयातील पासपोर्ट विभागाच्या निरीक्षकांच्या डिजिटल सिग्नेचरचा तांत्रिक प्रश्न निर्माण झाल्यामुळे अनेक नागरिकांचे पासपोर्टचे प्रस्ताव प्रलंबित होते. अभिजीत उबाळे यांनी या संदर्भातील माहिती दिल्यानंतर मी स्वत: पोलीस अधीक्षक कार्यालयातील कर्मचारी सत्यनारायणजी खेत्रे यांच्याशी संपर्क साधून अडचण समजून घेतली.

## मंगळवारी गुजर समाज देवसेनेची महत्वपूर्ण बैठक

**बीड । प्रतिनिधी**

दि.२० मे २०२५ मंगळवार रोजी जिल्ह्यातील गुजर समाज देवसेनेची विविध विषयावर प्रश्नांसाठी महत्वपुर्ण बैठक पंढरी कॉम्प्लेक्स, धानोरा रोड, बीड येथे आयोजित करण्यात आली आहे या ठिकाणी तालुका जिल्हा पदाधिकारी निवडण्याची प्रक्रिया देखील होणार आहे तरी ज्यांची इच्छा असेल त्यांनी संपर्क साधून चर्चा करावी आणि सदरील बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन गुजर समाज देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर, जिल्हा उपाध्यक्ष सुनील गुजर, जिल्हा संघटक अरुण नाना खटाणे, जिल्हा सचिव विनायक गुजर, जिल्हा कोषाध्यक्ष गजानन बहिरवाळ, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजेंद्र गुजर, जिल्हा उपाध्यक्ष अशोक घुशीर, शिरूर तालुकाप्रमुख शहादेव डोंगर, तुकाराम डोंगर, बाळू डोंगर यांच्या वतीने करण्यात आले आहे. दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की, गुजर समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी, तसेच समाज बांधव-भगिनींसाठी, समाजातील छोट्या-मोठ्या अडचणी सोडवण्यासाठी या बैठकीच्या माध्यमातून पदाधिकार्यांची बांधणी करावयाची आहे. आपल्या संघटनेतला माणूस आपापल्या सोयीनुसार कोणत्याही पक्षाचे काम करू शकतो त्याला बंधन नाही आपण फक्त समाज म्हणून समाजाच्या अडीअडचणीसाठी एकत्र येऊन समस्या सोडवण्याचे हेच एक उद्दिष्ट आपल्या डोळ्यासम ोर आहे. तसेच आपल्या समाजाचे अनेक कर्मचारी वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत आहेत त्यांना राजकीय लोकांचा त्रास होत आहे त्याच्यासाठी आपल्याला काय करता येईल हेही विचार करणे आवश्यक आहे.

## 'मेडिकयेर'कडून उच्च रक्तदाबनिमित्त जनजागृती रॅली

### ▸आरोग्याच्या मूलमंत्राने बीड शहर दणाणाले

**बीड । प्रतिनिधी**

जागतिक उच्च रक्तदाब दिन (१७ मे) निमित्त बीडमध्ये मेडिकेयर हॉस्पिटलच्या वतीने आरोग्य जागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. डॉ.सुनील बोबडे डॉ.अजित घोडके, डॉ. उमेश घायतिडक, डॉ. सुरेश पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली पार पडली, ज्यामध्ये रुग्णांच्या काळजीचे महत्त्व, रक्तदाब नियंत्रणाचे उपाय आणि नियमित तपासणीची गरज यावर भर देण्यात आला. या रॅलीत आरोग्याच्या जनजागृतीचे फलक विद्यार्थ्यानींनी झळकावले होते.

जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त बीड शहरामध्ये



(दि.१७) मे शनिवार रोजी या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते, या रॅलीमध्ये डॉ. सुनील बोबडे, डॉ. अजित घोडके, डॉ. उमेश घायतिडक, डॉ. सुरेश पिंपळे यांसह अनेक आरोग्यकर्मी आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी बीडकरांनी मोठ्या प्रम ाणात उत्साहाने सहभाग घेतला आणि उच्च रक्तदाबावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित तपासणी, संतुलित आहार आणि व्यायामाचे महत्त्व यावर भर देण्यात आला. आज च्या धाकाधकीच्या जीवनात माणसांना आरोग्याकडे लक्ष देणे शक्य नसल्यामुळे अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. कमी वयात अगदी तरुणपणात आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्याने अनेकांना जीव ही गम वावा लागतो, त्यामुळे आरोग्य ठीक तर आयुष्य ठीक असल्याचे सांगत मेडिकयेर ही जन जागृती रॅली आयोजित केली होती. या रॅलीत बीडकरांना आरोग्याचा कानमंत्र देण्यात आला.

## दिमाखवाडीच्या सानिका देवकर, रोहण देवकरचे दहावीच्या परीक्षेत यश





**बीड । प्रतिनिधी**

सेंट झेवियर्स स्कूल, गेवराई च्या सानिका संतराम देवकर हिने दहावीच्या परीक्षेत ९४.६० टक्के तर व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय, बीडच्या रोहन बप्पासाहेब देवकर या विद्यार्थ्याने ९१.४० टक्के घेऊन यश संपादन केले. या यशाबद्दल दोघांचेही सर्वत्र अभिनंदन होत आहे.

दिमाकवाडी तालुका गेवराई येथील सानिका संतराम देवकर या विद्यार्थीनिने मराठीमध्ये ९१, हिंदी ८४, इंग्रजी ९६, गणित ९६, विज्ञान आणि तंत्रज्ञान ८९, सामाजिक विज्ञान ९८ गुण मि ळवत यश संपादन केले. तर रोहण बप्पासाहेब देवकर याने मराठीमध्ये ८८, संस्कृत ९३, इंग्रजी ८७, गणित ७६, विज्ञान आणि तंत्रज्ञान ९६, सामाजिक विज्ञान ९३ गुण मिळवले आहेत. या यशाबद्दल सानिक आणि रोहनचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# आईच्या कुशीतच १ वर्षाच्या बाळाने जीव सोडला; आगीनं अख्ख सोलापूर हळहळलं

**सोलापूर । प्रतिनिधी**

अक्कलकोट एम आयडीसीतील उस्मानभाईंच्या कारखान्याला लागेल्या आगीच्या धुराने अख्ख्या सोलापूरवासीयांच्या डोळ्यात पाणी आलय. कारण, या दुर्घटनेत ८ निष्पापांचा जीव गेला असून एक वर्षाच्या चिमुकल्यानेही आपल्या आईच्या कुशीतच दम तोडला. नरसंहार ठरलेल्या आगीपासून बचाव करण्यासाठी जिवाच्या आंकातेने, मंसुरी कुटुंबीय वरच्या मजल्यावरील बेडरुममध्ये गेले. पण, काळ बनून आलेल्या आगीत होरपळून उस्मानभाईंच्या कुटुंबीतील ५ जणांसह कंपनीतील तीन कामगारांचा मृत्यू झाला. आगीच्या घटनेची माहिती मि ळताच सकाळपासून कंपनीबाहेर स्थानिकांनी, सोलापूकरांनी धाव घेऊन मदतीसाठी प्रयत्न केले. म ात्र, नियतीपुढे सगळेच प्रयत्न फोल ठरले, वेळ आणि काळ आग बनून एकत्र आल्याने अनाकलीयन असं अघटीत घडलं.

उस्मानभाई म्हणजे दिलदार मनाचा माणूस, कंपनीतील कामगारांसाठी देवमाणूसच ते. म्हणूनच भयंकर आगीत मालक कामगारांसाठी आणि कामगार म ालकांसाठी धावून गेले. शेवटच्या क्षणापर्यंत सगळेच एकमेकांचा जीव वाचवण्यासाठी आगीशी झुंजले. पण, या आगीतच सर्वांनी अखेरचा श्वास घेतला. उस्मानभाईचा नातू, मुलगा, सून अख्ख कुटुंबच या दुर्घटनेत संपलं. त्यात, निदान आपलं बाळं तरी या महाकाय आगीतून वाचावं



म्हणून आईने १ वर्षाच्या युसुफला आपल्या कुशीत घेतलं होतं. पण, आईसह चिमुकल्यानेही आईच्या कुशीतच जीव सोडला. बचावासाठी बेडरुममध्ये गेलेल्या अग्निशमन दलाच्या जवानांनाही आईच्या कुशीतलं बाळ पाहून गहिवरुन आलं होतं. काळीज पिळवटून टाकणाऱ्या या घटनेनं सोलापूर शहर सुन्न झालं असून प्रत्येकजण हळहळ व्यक्त करतोय.

पहाटे तीन वाजताच्या सुमारास लागलेल्या सेंट्रल इंडस्ट्री कारखान्यातील भीषण आगीच्या घटनेत माणुसकी धावून आली, पण नियतीपुढे कुणाचेही चालले नाही. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी स्वत:ला झोकून देऊन बचावकार्य केलं. पण, त्यांच्याही हाती फक्त मृतदेहच लागले. पहाटे ५.३० च्या सुमारास आगीतून तीन कामगाराचे मृतदेह अग्निशमन दलाच्या जवानानी बाहेर काढले होते. त्यानंतर, कारखान्याचे मालक आणि त्यांचे कुटुंबीय आतच अडकल्याचे कळताच जवानांनी तब्बल १४ तास शर्तीचे प्रयत्न केले. आगीतून मार्ग काढण्यासाठी भिंत फोडून बेडरुमम ध्ये धाव घेतली. मात्र, बेडरुममधून उस्मानभाईंसह कुटुंबीयांचे ५ मृतदेहच त्यांच्या हाती लागले. सुरुवातीला हे पाचही जण बेशुद्ध असावेत असा अंदाज काहींनी लावला होता. कुणाचातरी श्वास सुरू असेल म्हणून लागलीच रुग्णावाहितकेतून रुग्णालयात गाठलं. मात्र, आगीच्या दुर्घटनेत सगळ्यांनीच दम सोडल्याचं डॉक्टरांकडून सांगण्यात आले. या भीषण घटनेत आतापर्यंत एकूण ८ जणांचा मृत्यू या घटनेत झाला आहे. त्यामध्ये सेंट्रल इंडस्ट्रीचे मालक उस्मान मंसूरी वय ८७, अनस मंसूरी वय २४, शीफा मंसूरी वय २२, युसुफ मंसूरी वय १ वर्ष, आयेशा बागवान वय ३८, मेहताब बागवान वय ५१, हिना बागवान वय ३५, सलमान बागवान वय ३८ असे होरपळून मृत्यू झालेल्यांची नावे आहेत.

महाभंयकर आगीपासूनच्या बचावासाठी शीफा मंसुरी यांनी आपल्या बाळाला कुशीत घेतलं होतं. युसूफ मंसूरी हा १ वर्षाचा चिमकुला आपल्या आईच्या कुशीत होता, पण आईसह त्या बाळानेही आईच्या कुशीतच जीव सोडला. या अत्यंत हृदयद्रावक घटनेनं संपूर्ण सोलापूर शहर हळहळलं आहे.

दैनिक मराठवाडा पत्र
● epaper.marathwadapatra.com
सोमवार, दि.१९ मे २०२५ पान ४



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मुंबई येथील शिवसेना भवन या ठिकाणी पक्षाच्या बैठकीस उपस्थित होत असतांना, विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते मा. अंबादासजी दानवे साहेबांनी आवर्जून बीड च्या पक्ष कार्याची चौकशी केली. जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या सोबत, संपर्क प्रमुख मा. परशुराम जी जाधव साहेब, संभाजीनगर चे मा. राजु वैद्य, नवनाथ प्रभाळे, सतीश परदेशीं

# नेकनूर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाच्या आंदोलनास मनोज जरांगे व दीपक केदार यांची भेट

## ▸आंदोलन उपोषणाचा आज दुसरा दिवस

**नेकनूर । प्रतिनिधी**

नेकनूर ग्रामपंचायतने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकास जागा देण्यास जागा देण्यास टाळाटाळ केल्यामुळे अजयसिंह काळे यांच्यासह शिवप्रेमी आमरण उपोषणास बसले असता मनोज जरांगे यांनी आंदोलनास भेट देऊन आंदोलक अजयसिंह काळे व नेकनूर येथील शिवप्रेमी यांच्यासोबत असून प्रशासनास छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकास नेकनूर या ठिकाणी तात्काळ जागा उपलब्ध करून द्यावी असे बोलण्याची ग्वाही दिली. तसेच ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार यांनी उपोषण स्थळी भेट देऊन नेकनूर ग्रामपंचायतचे





पंचायत विकास अधिकारी श्री नागरे साहेब सरपंच पती सुंदर लांडगे यांच्याशी बोलून लवकरच हा विषय मार्गी लावण्याचे सांगितले आहे. तसेच उपोषणकर्ते अजयसिंह काळे व नेकनूर येथील शिवप्रेमी सोबत कायम असल्याचे सांगितले यावेळी उपस्थित ऑल इंडिया पँथर सेना महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हा अध्यक्ष नितीन सोनवणे तालुका अध्यक्ष गणेश चक्रे तसेच संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# धनंजय मुंडेंनी घेतली शिवराज दिवटेची भेट

**दिवटे कुटुंब माझ्या घरातले, शिवराजच्या आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करावी - धनंजय मुंडे**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दोन दिवसांपूर्वी परळी तालुक्यात मारहाण झालेल्या शिवराज दिवटे या तरुणाची अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात जाऊन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी भेट घेत त्याच्या तब्येतीची विचारपूस केली तसेच शिवराज व त्याच्या कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला.

शिवराज दिवटे याला परळी तालुक्यात एका टोळक्याने केलेल्या मारहाणीनंतर तू सध्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण



रुग्णालयात उपचार घेत असून त्याच्यावर सुरू असलेल्या उपचारांची ही धनंजय मुंडे यांनी स्वरातीचे अधिष्ठाता डॉक्टर धपाटे

**● आम्ही शिवराज दिवटे व कुटुंबियांच्या पाठीशी; मुंडेंनी शिवराज सह दिवटे कुटुंबीयांशी संवाद साधत दिला धीर**

**● या घटनेत जाती धर्माचा संबंध नाही – धनंजय मुंडे यांनी पोलीस अधीक्षक यांच्या भूमिकेचे केले समर्थन**

यांच्याकडून माहिती घेतली. शिवराज सह संदिपान दिवटे व दिवटे कुटुंब हे माझ्या घरातील असल्यासारखे आहेत, सुरज ला

▶▶ उर्वरित पान २ वर

# राज्यव्यापी कर्जमुक्ती आंदोलनाची मशाल पेटली

**कर्जमुक्ती द्या अन्यथा मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही -रविकांत तुपकर**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचे खोटे आश्वासन देणाऱ्या राज्यातील महायुती सरकारविरोधात क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन छेडले जाणार असुन या अनुषंगाने राज्यात विविध जिल्ह्यात कर्जमुक्ती एल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. शनिवारी दि.१७ मे रोजी रात्री ८ वाजता अंबाजोगाई तालुक्यातील देवळा येथे आयोजित कर्जमुक्ती एल्गार मेळाव्यात क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी राज्य सरकारविरोधात शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्ती मिळविण्यासाठी मशाल पेटवून राज्यव्यापी आंदोलनाचे रणशिंग फुंकले . सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्या संदर्भात दुर्लक्ष केले तर जून महिन्यामध्ये राज्यभरात आक्रमक आंदोलन छेडले जाईल राज्यातील कुठल्याही मंत्र्याला रस्त्यावर फिरू दिले जाणार नाही मंत्राच्या बुडाखाली आग लागल्याशिवाय शेतकरी स्वस्थ बसणार नाही

▶▶ उर्वरित पान २ वर

**(देवळा )मांजरा ग्रीनबेल्ट मधून शेतकरी नेते रविकांत तुपकरांनी सरकारविरोधात रणशिंग फुंकले! कर्जमुक्ती एल्गार मेळावा संपन्न!**



# गेवराई: तय्यबनगरातील नागरिक पीटीआरपासून वंचित

**उपमुख्यमंत्री अजित पवार, अमरसिंह पंडित यांना मुस्लिमाचे वावडे का? सय्यद एजाज**

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील संजयनगर आणि साठेनगर येथील अतिक्रमणधारकांना माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या पुढाकाराने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते १९ मे रोजी पीटीआर वाटपाचा कार्यक्रम होणार आहे.



मात्र, मुस्लिम बहुल तय्यबनगर भागातील अतिक्रमणधारकांना या योजनेतून जाणीवपूर्वक वगळल्याचा गंभीर आरोप माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी केला आहे. त्यांनी माजी आ. पंडित आणि ना.अजित दादा पवार

▶▶ उर्वरित पान २ वर



*आष्टी – राजे संभाजी उद्योग समूहाच्या वतीने आष्टीतील दहावीच्या परीक्षेत सेम टू सेम जुळ्या बहिणीं अनुष्का देशपांडे,तनुष्का देशपांडे यांनी ९६ टक्के गुण मिळविले व दहावीच्या परीक्षेत अलिशा पठाण हिला ९४ टक्के गुण मिळविले या तिघींनी घवघवीत यश मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी उद्योजक अमोल राजे शिंदे, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार जावेद पठाण, माजी सरपंच बिबीशन भवर, संभाजी दादा कोकणे, गंगासेठ माजी सरपंच कारखेल ,आजिनाथ घुले ,निहाल पठाण,अंबादास घुले, सलीम पठाण,सुदर्शन फसले सालेवडगाव,आत्माराम आवारे,मुख्याध्यापक शेख इद्रिस सर, तुळशीराम शिंदे तुकाराम भवर बबन दादा शिंदे, शिवाजी तावरे,राजू पवळ ग्रामसेवक,शेख बब्बू गणेश कोकणे ,विकास शिंदे ,पप्पू वाळेकर आदी दिसत आहेत.*

## सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात रक्तदान शिबीर संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या वीस-पंचवीस दिवसापासून भारत पाकिस्तान युद्धजन्य परिस्थिती संपूर्ण देशात निर्माण झाल्यामुळे सदर परिस्थितीची पूर्वतयारी आणि खबरदारी म्हणून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक च्या सूचनेनुसार दि.१७ मे २०२५ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याचे सांगितल्याप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले.या शिबिरामध्ये ४० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे सल्लागार डॉ.अरुण भस्मे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित उपप्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ.गणेश पांगारकर, डॉ.अंजली पवार, डॉ.विवेक दुसाने, डॉ. अशोक शिंदे, डॉ.अंजली ढोले, डॉ.वृषाली कुलकर्णी, डॉ.सारिका ससाने, डॉ.मीना हांगे तसेच विद्यार्थी प्रतिनिधी भूषण अवसरमले, राष्ट्रीय सेवा

▶▶ उर्वरित पान २ वर

# भारतीय सैन्यांचे मनोबल वाढवण्यासाठी माजलगावात तिरंगा रॅली

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय सैन्याने पाकिस्तान व केलेल्या कारवाईचे कौतुक करत सैन्याचे मनोबल वाढवण्यासाठी शहरांमध्ये तिरंगा रॅली दि. १८ रविवार रोजी काढण्यात आली. काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ भारतीय सैन्याने पाकिस्तानवर कारवाई करत दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानातील



अनेक दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करत कारवाई केली आहे. याचा विजय उत्सव व भारतीय सैन्याचे मनोबल वाढवण्यासाठी शहरांमध्ये तिरंगा रॅली काढण्यात आली होती.

▶▶ उर्वरित पान २ वर

# शालेय पोषण आहार कामगार संघटनेचे चौथे अधिवेशन संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शालेय पोषण आहार कामगार संघटनेचे त्रैवार्षिक चौथे माजलगाव तालुका अधिवेशन शहरातील व्यंकटेश हॉल येथे उत्साहात संपन्न झाले असल्याची माहिती तालुका सचिव अशोक पोपळे यांनी माहिती दिली. या बाबत सविस्तर असे की ,महाराष्ट्र शालेय पोषण आहार कामगार संघटनेचे माजलगाव तालुक्याचे चौथे त्रैवार्षिक अधिवेशन




कॉम्रेड दत्ता डाके यांच्या हस्ते ध्वजरोहन करून सुरू झाले. कॉ दत्ता डाके यांनी या अधिवेशनाचे उद्घाटन करून तातुक्यातील सर्व शालेय पोषण आहार कामगारांनी आपल्या स्वतःच्या मागण्यासाठी संघटना मजबूत करून , संघर्ष करून मागण्या मान्य करून घेतल्या पाहिजेत . या वेळी तालुका सचिव यांनी मागिल ती वर्षाचा कार्याचा लेखी अवहाल सभागृहा समोर मांडला त्याच्यावर चर्चा होऊन एक मताने मंजूर करण्यात आला .यावेळी पुढील तीन वर्षासाठी अध्यक्ष म्हणून विनायक पौळ तर सचिव म्हणून अशोक पोपळे .यांची निवड करण्यात आली.

# ना.अजितदादांचे घड्याळ प्रा.ईश्वर मुंडे यांच्या हातात

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारी पदावर नौकरी करून खा.शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून स्वेछा सेवानिवृत्ती घेतलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात धारूर तालुकाध्यक्ष,ओबसी सेल प्रदेश सरचिटणीस व सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी सेल प्रदेशाध्यक्ष या पदांवर प्रभावीपणे कार्य केले.

सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आ.प्रकाशदादा सोळंके यांच्या विजयात प्रा.ईश्वर मुंडे यांचा मोलाचा वाटा होता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या फुटीनंतर प्रा.ईश्वर मुंडे यांनी खा.शरदचंद्र पवार यांच्यासोबत राहणे पसंद



केले. खा.शरदचंद्र पवार साहेब व आ.जयंतराव पाटील साहेब यांच्या संम्मतीने प्रा.ईश्वर मुंडे यांनी बीड लोकसभा मतदारसंघ निवडणूक २०२४ लढविण्यासाठी बीड जिल्ह्य़ात जन संपर्क वाढवला होता परंतू शेवटच्या टप्प्यात खा.बजरंग बप्पा सोनवणे यांचा पक्षात प्रवेश झाल्याने प्रा.ईश्वर मुंडे यांना माघार घ्यावी लागली होती. या वेळी प्रा.ईश्वर मुंडे यांनी समाजाचा रोष पत्करून पक्षाचे उमेदवार खा.बजरंग बप्पा सोनवणे यांचा प्रचार केला होता. नंतर प्रा.ईश्वर मुंडे यांनी विधानसभा निवडणुक २०२४ साठी माजलगाव मतदारसंघाचा निवडणुक पुर्व जन संपर्क दौरा पूर्ण केला होता. या वेळेला ही

▶▶ उर्वरित पान २ वर

